Publication: Punyanagari
Date: 11/3/2019
Page: 1
Column: 1

पुण्य नगरी
सोमवार
११ मार्च २०१९

# अदानी समूहाकडून सुरक्षा सप्ताहाचे आयोजन

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडच्या माध्यमातून ४ ते १० मार्चदरम्यान राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेच्या माध्यमातून ग्राहकांना विद्युत सुरक्षेच्या उपायांबाबत माहिती देण्यात आली. नॅशनल सेफ्टी कौन्सिलचे नेतृत्व लाभलेली ही मोहीम यंदा ४८वा वर्धापन दिन साजरा करत आहे. राष्ट्र निर्माणासाठी सुरक्षा उपाय वाढवणे व टिकवणे ही या मोहिमेची थीम असून, अदानी समूहाने ग्राहकांच्या कल्याणासाठी आपला पाठिंबा वाढवत वितरण विभागातील २४ ठिकाणी आठवडाभर चालणाऱ्या जनजागृती मोहिमेची घोषणा केली होती. कंपनीची सेफ्टी टीम स्थानिक मुले व युवांना विद्युत सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण उपायांबाबत सांगीतले. यामुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येऊ शकतो, असा विश्वास कपंनीकडून व्यक्त करण्यात आला आहे.